महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२१/629 दिनांक : 26 FEB 2021

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय/शासन अनुदानीत/विनाअनुदानीत

अभियांत्रिकी,औषधनिमार्णशास्त्र पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी,

एम.बी.ए./एम.सी.ए.

अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

विषय : जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ करीता राज्य व जिल्हास्तरीय स्पर्धत सहभागी होण्याकरीता निवेदन .....

संदर्भ : मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय , मुंबई यांचे पत्र क्र १०/एनजीपी/संकीर्ण/ २०२१/१४२ दिनांक १५/०२/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येत की, जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ शांघाई (चीन) येथे होणार असून सदर स्पर्धेच्या नामांकनासाठी राज्य व देश पातळीवर निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेचे आयोजन १ मार्च २०२१ ते ३१ मे २०२१ या कालावधीत संबंधित जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तांत्रिक विद्यालयांच्या ठिकाणी आयोजन करण्यात येणार आहे.

सदर जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ मध्ये सहभागी होण्यासाठी करावयाच्या नोदणी बाबत सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्रात माहिती देण्यात आलेली आहे.

सोबत : संदर्भिय पत्र

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव.

सोबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे "जागतिक कौशल्या स्पर्धा २०२२ करीता राज्य व जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरीता निवेदन" सोबत जोडले आहे.

----*----*----*----

क्रमांक:१०/एनजीपी/संकीर्ण/२०२१/ १४२
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई-४००००१.

दिनांक : 15 FEB 2021

प्रति,

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, त्यांना कळविण्यात येते की, सदर पत्र आपल्या अखत्यारीत असणाऱ्या संस्थांच्या माहिती व कार्यवाहीसाठी निदर्शनास आणून देण्यात यावे.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल) मुख्य कार्यालय, मुंबई, यांना माहीतीसाठी व संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

पहिला मजला, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४००००१
ईमेल: ceo@mssds.in
दूरध्वनी क्र. ०२२ २२६२५६५१/५३

जा.क्र. - MSSDS/PFI/A-१०१/२०२०-२१/252-269 दि. ०८.०२.२०२१

## निवेदन

**विषय:-** जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ करीता राज्य व जिल्हास्तस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरीता निवेदन ......

**संदर्भ:-** १. भारत, प्रादेशिक आणि राज्य कौशल्य स्पर्धेसाठी, MSDE भारत सरकारने प्रसारित केलेली मार्गदर्शक तत्वे.
२. राज्य कौशल्य स्पर्धा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी द्वारे सादर केलेला प्रस्ताव.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. MSSDS/PFI/A-१०१/२०१९-२०/१३८३-८८, दि. २१.११.२०१९
४. NSDC कार्यालयाचे पत्र, दि. ०४.०२.२०२१

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सन् २०२०-२१ मध्ये आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील कौशल्य स्पर्धेच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने ४९ क्षेत्राशी संबधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, Sector Skill Council, विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने मार्च २०२० ते मे २०२० यादरम्यान Skill Competition आयोजित करण्यात आली होती. याबाबत संदर्भ क्र. ३ च्या पत्रानुसार स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता आपणास निवेदन देण्यात आले होते. त्यानुषंगाने राज्यातून एकूण ४९ क्षेत्रामधून एकूण २५,५६० उमेदवारांनी नोंदणी केली आहे. परंतु कोव्हीड-१९ संसर्गामुळे सदर स्पर्धा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली होती.

तथापि संदर्भ क्र. ४ नुसार, सदर स्पर्धेच्या आयोजनाकरिता राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (NSDC- National Skill Development Council) मार्फत नविन वेळापत्रक देण्यात आले असून जागतिक कौशल्य स्पर्धा वर्ष २०२२ मध्ये शांघाय (चीन) येथे आयोजित करण्यात येईल. तसेच, राज्य स्तरीय स्पर्धा मे २०२१ पर्यंत करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुषंगाने आजतागायत प्राप्त उमेदवारांची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल. तसेच, नविन उमेदवारांची नोंदणी करण्याकरिता NSDC पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर नोंदणीचा अंतिम दिनांक २८/०२/२०२१ असून, याबाबत आपल्या स्तरावरून प्रात्र उमेदवारांची नोंदणी करण्याकरिता सूचित करण्यात यावे.

त्यानुसार सदर स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर करून निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येतील. तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेचे आयोजन १ मार्च,

२०२१ ते ३१ मे, २०२१ या कालावधीत संबंधित जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तांत्रिक विद्यालयांच्या ठिकाणी आयोजन करण्यात येईल.

त्यानुसार सदर जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ मधील जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता पात्रता निकष खालीलप्रमाणे आहे.

**पात्रता निकष :**

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे.

सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, १९९९ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे. तसेच, एअरक्राफ्ट मेंटेनन्स, मेकाट्रॉनिक्स, इन्फॉरमेशन नेटवर्क केबलिंग, मॅन्युफॅक्चरिंग टीम चॅलेंज, वॉटर टेक्नॉलॉजी, क्लाऊड कंप्यूटिंग आणि सायबर सिक्युरिटी या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, १९९६ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे.

तरी, शांघाई (चीन) येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरीता सर्व ITI, Polytechnic Colleges, Technical High schools, MCVC Bifocal, प्रत्येक युनिव्हर्सिटी आधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी, कला, वाणिज्य, शास्त्र शाखेची आणि इतर कनिष्ठ तसेच, महाविद्यालये, तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांना सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता निवेदन करण्यात येत आहे.

त्यानुषंगाने, जागतिक कौशल्य स्पर्धा २०२२ शांघाई (चीन) करिता इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांनी https://worldskillsindia.co.in/worldskill/world/ या लिंकवर भेट देवून आपली नाव नोंदणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

दीपेन्द्र सिंह कुशवाह (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी, मुंबई

**प्रत कार्यवाहीस्तव:**

१. मा. आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता संचालनालय.
२. मा. कुलगुरू, महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठे
३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
४. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन
५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ, मुंबई.
७. उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, सर्व विभाग.
८. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्र, सर्व जिल्हे.